॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ११ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आविष्कार-२०२५ स्पर्धेचे आयोजन दोन टप्प्यात करणार येणार आहे. पहिल्या टप्प्यात विद्यापीठ प्रशाळेंसाठी दि. ४ डिसेंबर रोजी व दि. ८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय स्पर्धा जळगाव जिल्ह्याकरीता पी.आर. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे, धुळे जिल्ह्यासाठी झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे येथे तर नंदुरबार जिल्ह्यासाठी विद्यापीठ संचलित कला विज्ञान महाविद्यालय, मोलगी व आदिवासी अकादमी नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी अकादमी, नंदुरबार येथे आविष्कार -२०२५ जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. यानंतर विद्यापीठस्तरीय स्पर्धा दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी विद्यापीठात आयोजित केली जाणार आहे.

या स्पर्धेकरीता पदवी, पदव्युत्तर व पोस्ट पदव्युत्तर असे तीनस्तर असणार आहे. या प्रत्येक स्तरावर मानवविज्ञान, भाषा व ललितकला यांचा एक गट, वाणिज्य, व्यवस्थापन व विधी यांचा दुसरा गट तर विज्ञान विषयांसाठी तिसरा गट, कृषी व पशुपालन या विषयांसाठी चौथा गट, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विषयांचा पाचवा गट आणि औषधीनिर्माण व वैद्यकशास्त्र करीता सहावा गट असणार आहे. या स्पर्धेत पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विजेत्यांना देण्यात येणाऱ्या बक्षिस रक्कमेत या वर्षापासून वाढ करण्यात आली असून रोख स्वरुपात पहिले पारितोषिक रू. २०००/- , दुसरे पारितोषिक रू. १५००/- , तिसरे पारितोषिक रू. १०००/- तर पोस्ट पदव्युत्तरांसाठी पहिले पारितोषिक रू. २०००/- व दुसरे पारितोषिक रू. १५००/- दिले जाणार आहेत. तसेच राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत विजेत्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी अधिछात्रवृत्ती (प्रथम क्र. रू. ३५,०००/-, द्वितीय रू. ३०,०००/- तर तृतीय रू. २५,०००/- ) तर पोस्ट पदव्युत्तर विजेत्या विद्यार्थ्यांना दोन वर्षासाठी अधिछात्रवृत्ती (प्रथम क्र. रू. १,२०,०००/- व द्वितीय क्र. १,००,०००/-) अशी दिली जाणार आहे. तसेच राज्यस्तरीय सहभागी विद्यार्थ्यांना १० गुणांचे किंवा त्या समकक्ष क्रेडीट देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रू. २००/- भरून नोंदणी करावी लागणार आहे.

या स्पर्धेतील सहभागासाठी प्रशाळेतील गटाकरीता प्रा.विशाल पराते व डॉ. संदीप भामरे यांच्याशी तर जळगाव जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्तरासाठी प्राचार्य उदय जगताप, डॉ. दीपक बोंडे, डॉ. स्वप्नील खरे, धुळे जिल्ह्यासाठी प्राचार्य वर्षा पाटील, डॉ. रवींद्र महाले व डॉ. समाधान पाटील तर नंदुरबार जिल्ह्याकरीता प्रा.किशोर पवार, डॉ. स्मिता देशमुख, डॉ. योगेश राणे यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेचे प्रमुख कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी तर उपप्रमुख प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ.विनोद पाटील असून उपसमन्वयक डॉ. अमरदीप पाटील व समन्वयक डॉ. नवीन दंदी हे आहेत. असे स्पर्धेचे सचिव डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, विद्यार्थी विकास संचालक यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ११ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता